**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**गुरुवार दिनांक ०१ जानेवारी २०२६**

**ठळक बातम्या**

1. **नववर्षाचं देशभरात उत्साहात स्वागत; नववर्षानिमित्त अनेक मंदिरांत भाविकांची गर्दी.**
2. **नाराज पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांशी चर्चा केल्यानंतर अपक्ष अर्ज मागे घेतले जातील असा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला विश्वास.**
3. **९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनास आज सुरुवात; ज्येष्ठ लेखिका डॉ. मृदुला गर्ग यांच्या हस्ते उद्या होणार औपचारिक उद्घाटन.**
4. **गोंदिया वगळता विदर्भात किमान तापमानात किंचित वाढ.**

---

नववर्ष

नववर्षाचं स्वागत देशभरासह राज्यात आनंदात आणि उत्साहात झालं. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागरिकांना नववर्षाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. संपूर्ण वर्ष चांगले जावे यासाठी नागपूरकरांनी नववर्षाची सुरुवात नागपुरातील प्रसिद्ध गणेश टेकडी मंदिर येथे जावून दर्शनाने केली. गणेश टेकडी मंदिरात नववर्षानिमित्त फुलांचा आकर्षक देखावा आणि मंडपाची आकर्षक सजावट करण्यात आलेली आहे. मोठ्या प्रमाणात भाविक दर्शनासाठी टेकडी मंदिरात दाखल होत आहेत. तर गोंदियामधे सुद्धा नागरा धाम मंदिरातील पंचमुखी शिवलिंगाच्या दर्शनासाठी तसंच सिव्हिल लाईन भागातल्या हनुमानाचं दर्शन घेण्यासाठी सकाळपासून भाविकांची मोठी रांग लागली होती. वाशिम शहरातील संकल्प आणि सहयोग फाउंडेशन या सामाजिक संस्थांनी नववर्षाच्या पहिल्या दिवशी वाशिम शहरातील महापुरुषाचे पुतळे स्वच्छ करीत आगळ्या वेगळ्या पद्धतीनं नववर्षाच स्वागत केल. छत्रपती शिवाजी महाराज, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर, लोकमान्य टिळक, यांच्यासह विविध महापुरुषांच्या पुतळ्यांची स्वच्छता करून माल्यार्पण करण्यात आलं. वर्षाच्या अखेरच्या दिवशी आलेल्या भागवत एकादशीनिमित्त पैठण येथील संत एकनाथ महाराज समाधी मंदिरात एक लाखाहून

अधिक भाविकांनी दर्शन घेतले. नाताळ आणि नववर्षाच्या पार्श्वभूमीवर पैठणमध्ये मोठ्या प्रमाणावर भाविक दाखल झाले आहेत. मराठवाड्यासह राज्यातील विविध भागांतून आलेल्या भाविकांमुळे मंदिर परिसर यात्रेचे स्वरूप घेत आहे.

---------------------------------------------

चंद्रशेखर बावनकुळे

महापालिका आणि जिल्हा परिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षातील नाराज पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांशी चर्चा करून अपक्ष अर्ज मागे घेतले जातील, असा विश्वास महसूल मंत्री तथा नागपूर आणि अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला. नागपूर येथे प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना ते बोलत होते. भाजपचे कार्यकर्ते पक्षाच्या विजयासाठी कटिबद्ध आहेत. काही कारणांमुळे नाराज झालेले कार्यकर्तेही शेवटी पक्षासाठीच काम करतील. अपक्ष अर्ज दाखल केलेल्या सर्वांशी चर्चा करण्यात येणार असून लवकरच सकारात्मक निर्णय होईल असेही बावनकुळे म्हणाले. स्थानिक पातळीवर वेगवेगळी समीकरण बनत असली तरी महायुती म्हणूंन आम्ही कायम आहोत असं प्रतिपादन बावनकुळे यांनी केलं.

***(होल्ड बाईट - बावनकुळे)***

***संकेत महायुतीचाच आहे पण स्थानिक लेवलला त्या काही ठिकाणी कार्यकर्त्यांनी किंवा तिथल्या शिवसेना भाजपमध्ये आपसात न पटल्यामुळे काही ठिकाणी युती झाली नाही. पण राज्याचा जो काही चर्चा झाली आहे. राज्यात जे काही आम्ही एकत्र बसलेला आहोत त्यामुळे युतीमध्येच आम्ही त्या ठिकाणी जाणार आहोत व स्थानिक लेवलला मात्र त्या ठिकाणी कधी कधी वरच्या स्तरावर युती केल्यानंतरही खाली स्थानिक लेवलला काही ठिकाणी अडचणी तयार होतात दोन्ही पक्षाकडून त्यामुळे कधी कधी महायुती त्या त्या ठिकाणी तुटलेली आहे मला असं वाटतं की आता जिल्हा परिषदला आम्ही पुन्हा एकत्र बसून.***

दरम्यान, नागपूर महानगरपालिका निवडणुकीसाठी उभे असलेल्या भारतीय जनता पक्षाच्या सर्व १५१ उमेदवारांची आणि निवडणूक संचालन समितीची बैठक भाजप शहर अध्यक्ष दयाशंकर तिवारी यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच पार पडली. या बैठकीत निवडणूक संदर्भात सर्व उमेदवारांना आवश्यक सूचना देऊन मार्गदर्शन करण्यात आल.

---------------------------------------------

उमेदवारी अर्ज

राज्यातल्या महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्जांची काल छाननी झाली. त्यानंतर राज्य निवडणूक आयोगानं सर्व महानगरपालिकांमध्ये दाखल झालेल्या एकंदर उमेदवारी अर्जांबाबत माहिती दिली. त्यानुसार राज्यातल्या २९ महानगरपालिकांच्या एकूण ८९३ प्रभागांमधून दोन हजार ८६९ जागांसाठी ३३ हजार ६०६ उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले आहेत. उद्या दुपारी तीन वाजेपर्यंत अर्ज मागे घेता येतील. तीन जानेवारीला निवडणूक चिन्हाचं वाटप झाल्यानतर अंतिम उमेदवार यादी जाहीर होणार आहे. दरम्यान अमरावती महापालिका निवडणुकीसाठी शेवटच्या दिवस अखेर सातही झोनमध्ये ८७ जागांसाठी सुमारे उमेदवारांनी ८३३ नामांकन दाखल केले होते. यापैकी सातही प्रभागातून १४ उमेदवारांचे नामांकन विविध कारणामुळे बाद झाले असून आता रिंगणात ८१९ उमेदवार कायम आहेत. तर चंद्रपूर मनपा निवडणूकीसाठी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची ५ कार्यालये मिळुन ५८४ अर्ज अंतिमरित्या स्वीकारण्यात आले . यातील ५६२ उमेदवारांचे नामांकन वैध तर २२ जणांचे नामांकन अवैध ठरले आहे.

---------------------------------------------

मुनीरा शेख

नाशिक जिल्ह्यातील मालेगाव महापालिकेतील छाननीच्या वेळी प्रभाग ६ मध्ये अन्य स्पर्धक पक्षांचे उमेदवारी अर्ज बाद झाल्याने इस्लाम पार्टीच्या मुनीरा शेख यांच्या बिनविरोध निवडणूक निश्चीत झाली आहे. माघारीनंतर त्यांच्या निवडीची औपचारीकता बाकी आहे.

---------------------------------------------

विकसित भारत

सरलेलं २०२५ हे वर्ष भारतीय क्रीडा क्षेत्रासाठी महत्त्वाचं ठरलं. अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून-

***(व्हीसी-नम्रता)***

***२०२५ या वर्षात आंतरराष्ट्रीय स्तरावर पदकांची कमाई तर  झालीच पण खेळांमध्ये विक्रमी सरकारी गुंतवणूक, महत्वाच्या धोरणात्मक सुधारणा आणि विस्तारित पायाभूत सुविधांनी भारतीय क्रीडा विश्वात नव्या युगाचा पाया रचला. केंद्र सरकारने २०२५-२६ या आर्थिक वर्षात युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालयासाठी ३ हजार ७९४ कोटी रुपयांची विक्रमी तरतूद केली. जुलै महिन्यात केंद्रीय मंत्रिमंडळाने राष्ट्रीय क्रीडा धोरण २०२५ला मंजुरी दिली. या नवीन धोरणात भारताला जागतिक क्रीडा महासत्ता बनवण्यासाठी दीर्घकालीन योजना तसंच २०३६मध्ये भारतात ऑलिम्पिक***

*भरवण्यासाठीच्या धोरणांचा समावेश आहे. ऑगस्ट महिन्यात राष्ट्रीय क्रीडा प्रशासन कायदा २०२५ लागू करण्यात आला. त्यामुळे या सुधारणांना आणखी गती मिळाली. क्रीडा संस्थांना आंतरराष्ट्रीय मानकांनुसार लागू असलेल्या आचारसंहितेचं पालन करणं, महिला, अल्पवयीन खेळाडू तसंच दिव्यांग खेळाडूंच्या वैयक्तिक संरक्षणासाठीचं सुरक्षित क्रीडा धोरण स्वीकारणं या कायद्यामुळे बंधनकारक झालं. नोव्हेंबर महिन्यात भारताने २०३०मध्ये होणाऱ्या राष्ट्रकुल स्पर्धांचं यजमान पद मिळवलं. (आकाशवाणीसाठी वृत्तविभागातून मी नम्रता फलके)*

---------------------------------------------

साहित्य संमेलन

सातारा येथे होणाऱ्या चार दिवसीय ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनास आज सुरुवात झाली. आज दुपारी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, डॉ.तारा भवाळकर यांच्याहस्ते ध्वजारोहण झाले. यानंतर ९८ व्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा डॉ. तारा भवाळकर यांच्या हस्ते ग्रंथप्रदर्शनाच उदघाटन झाल. मराठी भाषा समृद्ध होण्यासाठी सर्व घटकांनी एकत्र प्रयत्नशील राहावे अस मत डॉ.तारा भवाळकर यांनी यावेळी व्यक्त केल. उद्या साहित्य संमेलनाचं औपचारिक उद्घाटन ज्येष्ठ लेखिका आणि विचारवंत डॉ. मृदुला गर्ग यांच्या हस्ते होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मराठी भाषा मंत्री उदय सामंत, संमेलनाचे नियोजित अध्यक्ष लेखक विश्वास पाटील समारंभाला उपस्थित राहतील.

---------------------------------------------

भीमा कोरेगाव

पुण्याजवळ कोरेगाव भीमा इथं आज शौर्यदिन उत्साहात साजरा केला जात आहे. या ठिकाणी असलेल्या विजयस्तंभाला अभिवादन करण्यासाठी लाखो अनुयायांनी मोठी गर्दी केली आहे. विजय दिनाच्या पार्श्वभूमीवर याठिकाणी पोलिसांचा कडक बंदोबस्त तैनात करण्यात आला असून, पाच हजार पोलीस सुरक्षिततेसाठी तैनात करण्यात आले आहेत. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी ५० पोलिस टॉवर, दहा ड्रोनची याठिकाणी नजर असणार आहे. जिल्हा प्रशासनाने अनुयायांसाठी सर्व प्रकारच्या सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. दरम्यान, नागपूर इथं डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती दीक्षाभूमी च्यावतीने भिमा कोरेगाव शौर्य दिन अभिवादन सोहळ्याच आयोजन दीक्षाभूमी परिसरात करण्यात आल आहे.

---------------------------------------------

VNIT

VNIT नागपूरसह विविध संस्थांच्या संयुक्त सहभागाद्वारे विदर्भातील ग्रामीण भागात बायोगॅस प्रकल्प वितरण आणि अंमलबजावणी उपक्रम राबविण्यात येणार आहे. या उपक्रमासाठी विश्वेश्वरय्या राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था, यांना ज्ञान भागीदार म्हणून सहकार्य करण्याची विनंती करण्यात आली आहे. हा उपक्रम संपूर्ण विदर्भात राबविण्यात येणार असून आज, अकोला जिल्ह्यातील मुरांबा , अमरावती जिल्ह्यातील रेवसा तसेच नागपूर जिल्ह्यातील उमरी वाघ या गावांमध्ये बायो गैस संयंत्र निशुल्क वितरित करण्यात आले.

---------------------------------------------

हवामान

गोंदिया इथं सातत्याने नीचांकी किमान तापमानाची नोंद होत असून आज देखील आठ पूर्णांक पाच दशांश अंश इतकं किमान तापमान इथं नोंदवलं गेलं. इतर जिल्ह्यांमध्ये मात्र किमान तापमानात किंचितशी वाढ झाली आहे. भंडारा इथं दहा, नागपूर मध्ये दहा पूर्णांक दोन, अमरावती इथं 11, वर्धा येथे 11.8, गडचिरोली इथं 11.4, यवतमाळ येथे बारा, तर चंद्रपूर इथं 13.5 इतक्या किमान तापमानाची नोंद झाली. पश्चिम विदर्भात वाशिम येथे दहा पूर्णांक आठ इतकं किमान तापमान आहे तर बुलढाणा इथं 14.8 इतकं किमान तापमान नोंदवल गेल.

---------------------------------------------